# १ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना (व्यवसाय शिक्षण)

१.१) माध्यमिक शालांत परीक्षा स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम.

१.२) +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम.

१.३) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/ एच.एस.सी. व्होकेशनल(पूर्वीचे एम.सी. व्ही सी.)

१.४) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

१.५) कौशल्य विकास कार्यक्रम व अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

टीप :- १) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाचे अल्प मुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जातात व याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत केली जाते.

२) विविध कौशल्य विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम (MES) हे व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर्स मार्फत राबविले जातात व याबाबची कार्यवारी संचालक(प्रशिक्षण) याचे कडून केली जाते.

३) उपरोक्त सर्व (अ. क्र. १.१ ते १.५) अभ्यासक्रम सुरू करणेबाबतची सर्व माहिती ही प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयात मिळेल.

## १.१) माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम

माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम योजनेअंतर्गत इ. ९ वी, व इ. १० वी स्तरावर कार्यानुभव विषयाऐवजी विद्यार्थ्यांना तांत्रिक विषयात उपलब्ध असलेल्या तीन विषयांपैकी एक ऐच्छिक विषय निवडता येतो.

माध्यमिक स्तरावरील या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे कौशल्य, स्वकर्तुत्व, क्रियाशिलता इत्यादी गुणांचा विकास होतो. या अभ्यासक्रमामुळे व्यवसाय /तांत्रिक विषयाची आवड निर्माण होऊन शालेय जीवनात रोजगार/ स्वयंरोजगारासाठी आवश्यक त्या उद्यमशिलतेचा विकास होतो व छोटी कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात होतात. भविष्यात हे विद्यार्थी अभियांत्रिकी किंवा तत्सम व्यवसाय शिक्षणाकडे जातात.

**माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम योजनेतंर्गत राबविण्यात येणारे अभ्यासक्रम**

**१.१.१ माध्यमिक स्तरावरील पर्व व्यावसायिक अभ्यासक्रम योजनेतंर्गत राबविण्यात येणारे अभ्यासक्रम (Introduction to Basic Technology) I.B.T. -**

**१) मूलभूत तंत्रज्ञानाची तोंडओळख (Introduction to Basic Technology) I.B.T. -**

**(V1) या अंतर्गत येणारे मॉडयुल्स**

१) शेती व्यवसाय

२) ऊर्जा व पर्यावरण

३) होम ॲण्ड मेडीकल सायन्स

४) इंजिनिअरींग ड्रॉईंग